दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ४ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १८९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष
द्वितीया सकाळी १०-१० पर्यंत
दिवस नक्षत्र–स्वाती रात्री ९-३६ पर्यंत
चंद्र रास- तुला, सूर्य रास - मीन, गुरु रास - मिथुन

### पावसाने पुणे ठप्प!

**पुणे:** गुरुवारी दुपारनंतर अचानक झालेल्या मुसळधार पावसाने आणि सोसाट्याच्या वाऱ्याने पुणे शहर अक्षरशः विस्कळीत झाले. शहरभर झाडे कोसळणे, पाणी साचणे आणि वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या काळात वानवडी, विद्यापीठ रस्ता, बाणेर, औंध, सिंहगड रोड, बिबवेवाडी, कोरेगाव पार्क, कात्रज, वारजे आणि पाषाण परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे कोसळल्याने वाहतूक विस्कळीत झाली.

## सारांश वृत्त

### लोको पायलटची गोळ्या झाडून हत्या

**समस्तीपूर (बिहार) :** बिहारच्या समस्तीपूर जिल्ह्यात शुक्रवारी मोटारसायकलस्वार हल्लेखोरांनी एका ३० वर्षीय लोको पायलटची गोळ्या झाडून हत्या केली, अशी माहिती पोलिसांनी दिली. ही घटना सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ताजपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली, जेव्हा ती व्यक्ती आपल्या दुचाकीवरून घरी परतत होती. मृताची ओळख रेल्वेतील लोको पायलट प्रमोद कापार (३०) अशी पटली आहे, असे त्यांनी सांगितले.

### काँग्रेस आमदार राजेंद्र भारती अपात्र

**भोपाळ :** बेकायदेशीर व्याज मिळवण्यासाठी बँकेच्या नोंदींमध्ये फेरफार केल्याच्या प्रकरणात दोषी ठरल्यानंतर मध्य प्रदेश काँग्रेसचे आमदार राजेंद्र भारती यांना राज्य विधानसभेतून अपात्र ठरवण्यात आले आहे. मात्र, या अपात्रतेमुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. बेकायदेशीर व्याज मिळवण्यासाठी बँकेच्या नोंदींमध्ये फेरफार केल्याच्या प्रकरणात दोषी ठरल्यानंतर, गुरुवारी रात्री या विषयावर विचारविनिमय करून विधानसभा प्रशासनाने भारती यांचे दातिया विधानसभा मतदारसंघातील सदस्यत्व रद्द करणारी अधिसूचना जारी केली.

### दिल्ली दरोडाप्रकरणी दोघांना अटक

**नवी दिल्ली :** शास्त्री नगरमध्ये दिवसाढवळ्या १०.६५ लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेची सशस्त्र लूट केल्याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. ही घटना २६ मार्च रोजी घडली. तक्रारदार, २२ वर्षीय अभिषेक प्रजापतीने त्याच्या मालकाच्या सूचनेनुसार शास्त्री नगरमधून ६५,००० रुपये आणि चांदनी चौकमधून १० लाख रुपये लुटले होते.

## २०२६ मध्ये ७० हजारांहून अधिक पदांची मेगा भरती – मुख्यमंत्री फडणवीस

# एमपीएससी भरतीला मिळणार वेग!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नागपूर :** राज्यातील स्पर्धा परीक्षार्थीसाठी दिलासादायक निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत होणारी भरती प्रक्रिया जलद गतीने पार पाडण्याचे निर्देश दिले आहेत. २०२६ मध्ये राज्यात तब्बल ७०,००० हून अधिक सरकारी पदांची मेगा भरती होणार असून, यात पोलिस, तलाठी, शिक्षक आणि इतर विविध विभागांतील रिक्त पदांचा समावेश आहे. यापैकी सुमारे २०,००० पदे एमपीएससीच्या माध्यमातून भरली जाणार आहेत.

गेल्या काही वर्षांत एमपीएससीच्या परीक्षा, निकाल आणि नियुक्ती प्रक्रियेमध्ये होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण होते. अनेक वेळा विभागांकडून मागणीपत्र उशिरा सादर होणे, आरक्षणासंबंधी अडचणी आणि प्रशासकीय प्रक्रियेमधील गुंतागुंत यामुळे भरती प्रक्रिया रखडत होती. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आयोगाला अधिक सक्षम करण्याचा निर्णय घेतला आहे.

याच अनुषंगाने एमपीएससीच्या तीन रिक्त सदस्यपदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. राजीव निवतकर, दिलीप भुजबळ आणि महेंद्र वारभुवन यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली असून, यामुळे आयोगाची कार्यक्षमता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नव्या सदस्यांच्या नियुक्तीमुळे प्रलंबित निकाल लवकर लागणे, परीक्षा वेळेत घेणे आणि निवड प्रक्रियेला गती मिळणे शक्य होणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यापूर्वीच एमपीएससी बळकट करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आता त्यांनी उच्चस्तरीय बैठक बोलावली असून, भरती प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः विविध विभागांकडून मागणीपत्र वेळेत पाठवणे, परीक्षा वेळापत्रक निश्चित करणे आणि निकाल प्रक्रिया गतिमान करणे यावर चर्चा होणार आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे राज्यसेवेत अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो युवकांना मोठा दिलासा मिळणार आहे. दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या भरती प्रक्रियांना गती मिळाल्यास स्पर्धा परीक्षार्थ्यांचा विश्वासही वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, तज्ज्ञांच्या मते, केवळ सदस्यसंख्या वाढवूनच नव्हे तर तांत्रिक प्रणाली अधिक सक्षम करणे, पारदर्शकता वाढवणे आणि वेळापत्रकाचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. सरकारने या दिशेने पावले उचलल्यास एमपीएससीची प्रतिमा अधिक मजबूत होईल.

एकूणच, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे भरती प्रक्रियेत वेग येऊन हजारो युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# जागतिक तणावाचा पुणेकरांना फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जागतिक स्तरावर सुरू असलेल्या भू-राजकीय घडामोडींचा थेट परिणाम आता पुणेकरांच्या दैनंदिन जीवनावर दिसू लागला आहे. पेट्रोल आणि घरगुती एलपीजी सिलिंडरच्या वाढत्या किमतींनी आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांना आता सीएनजी दरवाढीचा आणखी एक धक्का बसला आहे. पुण्यात सीएनजीच्या दरात दोन रुपयांची वाढ करण्यात आली असून नवे दर ३ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून लागू झाले आहेत.

पुणे शहर आणि परिसरात प्रामुख्याने महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड आणि टोरंट गॅस या कंपन्यांकडून सीएनजीचा पुरवठा केला जातो. यापैकी एमएनजीएलने दर कायम ठेवले असले तरी टोरंट गॅस कंपनीने ग्रामीण आणि उपनगरी भागात सीएनजीच्या दरात वाढ केली आहे. या दरवाढीपूर्वी पुण्यात सीएनजीचा दर ९२.५० रुपये प्रति किलो होता. मात्र आता नव्या दरानुसार नागरिकांना ९४.५० रुपये प्रति किलो मोजावे लागत आहेत. अचानक झालेल्या या वाढीचा सर्वाधिक फटका रिक्षाचालक, टॅक्सी चालक तसेच सीएनजीवर चालणाऱ्या खासगी वाहनधारकांना बसणार आहे. यामुळे दैनंदिन प्रवास खर्च वाढण्याची शक्यता असून त्याचा परिणाम प्रवासी भाड्यांवरही होऊ शकतो.

दरवाढीमागे आंतरराष्ट्रीय घडामोडींचा मोठा प्रभाव असल्याचे सांगितले जात आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे जागतिक इंधन पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला आहे.

# युद्धाचा परिणाम कमी करण्यासाठी विशेष पॅकेज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणाम लक्षात घेऊन केंद्र सरकार सतर्क झाले असून उद्योग क्षेत्राला दिलासा देण्यासाठी सुमारे दोन लाख कोटी रुपयांच्या मोठ्या आर्थिक पतसाहाय्य योजनेची तयारी सुरू करण्यात आली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळी विस्कळीत होणे, वाहतूक खर्च वाढणे आणि निर्यात-आयात व्यवहारांवर परिणाम होणे याचा फटका भारतीय उद्योगांना बसू नये, हा या योजनेमागील मुख्य उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

वित्त मंत्रालय सुमारे दोन लाख कोटी रुपयांच्या 'क्रेडिट सपोर्ट स्कीम'वर वेगाने काम करत आहे. ही योजना कोविड काळात राबवण्यात आलेल्या इमरजेंसी क्रेडिट लाइन गॅरंटी स्कीमच्या धर्तीवर असणार आहे. त्या काळात या योजनेमुळे लाखो लघु आणि मध्यम उद्योगांना मोठा दिलासा मिळाला होता. त्याच धर्तीवर आता जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर उद्योगांना कर्जाची हमी देण्याची योजना आखली जात आहे. वित्त मंत्रालयांतर्गत वित्तीय सेवा विभाग या योजनेला अंतिम स्वरूप देत असून येत्या काही दिवसांत या योजनेची घोषणा होण्याची शक्यता आहे. या योजनेअंतर्गत उद्योगांना विनाहमी कर्ज दिले जाणार असून त्या कर्जाला सरकारची हमी असणार आहे. त्यामुळे बँकांकडून कर्ज मिळणे सुलभ होईल आणि उद्योग क्षेत्रातील रोख तरलतेची समस्या कमी होण्यास मदत होईल.

## अध्यक्षपद आणि पार्थ पवारांच्या खासदारकीवर प्रश्नचिन्ह

# सुनेत्रा पवार यांच्या पत्रामुळे सत्तासंघर्ष तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सुरू झालेला अंतर्गत संघर्ष आता अधिकच तीव्र होताना दिसत आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोग यांना पाठवलेल्या पत्रामुळे पक्षातील सत्तासंघर्ष पुन्हा ऐरणीवर आला असून या पत्राचे राजकीय परिणाम दूरगामी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात २८ जानेवारीनंतर पक्षाकडून झालेला कोणताही पत्रव्यवहार ग्राह्य धरू नये, अशी मागणी केली होती. हे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली. या पत्रामुळे पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या हालचालींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. या पत्रातील मजकूरानुसार, २८ जानेवारीनंतर निवडणूक आयोगाशी झालेला सर्व पत्रव्यवहार रद्द मानावा, अशी मागणी करण्यात आली आहे. पत्रात सुनेत्रा पवार यांनी स्वतःचा उल्लेख राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून केला असून पक्षातील इतर पदाधिकाऱ्यांचा उल्लेख नसल्याचे दिसून येते. पत्रात फक्त राष्ट्रीय अध्यक्षा आणि पक्षाचे खजिनदार शिवाजीराव गर्जे यांचाच उल्लेख असल्याचे समोर आले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यासंदर्भात कार्यकारिणी बैठकीची माहिती निवडणूक आयोगाला दिली होती. मात्र सुनेत्रा पवार यांच्या नव्या पत्रामुळे २८ जानेवारीनंतर झालेल्या सर्व नियुक्त्या, निर्णय आणि पत्रव्यवहार रद्द होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पक्षातील सत्तासंघर्ष अधिकच तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

या घडामोडींचा परिणाम पार्थ पवार यांच्या राज्यसभा खासदारकीवरही होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पार्थ पवार यांच्या राज्यसभा उमेदवारीसाठी सादर करण्यात आलेल्या एबी फॉर्मवर प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या सह्या असल्याचे सांगितले जाते. जर २८ जानेवारीनंतरचा सर्व पत्रव्यवहार रद्द ठरला, तर या फॉर्मची वैधता देखील प्रश्नांकित होऊ शकते आणि त्याचा परिणाम त्यांच्या खासदारकीवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांत पक्ष संविधानात बदल करून कार्याध्यक्ष पदाला अधिक अधिकार देण्याचा प्रयत्न झाल्याचे आरोपही पक्षातील काही नेत्यांकडून करण्यात आले आहेत. या प्रक्रियेत सुनेत्रा पवार, पार्थ पवार किंवा बहुसंख्य आमदारांना विश्वासात घेण्यात आले नसल्याचेही बोलले जात आहे.

## धनगर समाज एकवटला, दोन गट आमनेसामने

# अंजणगाव खेलोबात पुतळ्यावरून तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सोलापूर :** माढा तालुक्यातील अंजणगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावरून मोठा तणाव निर्माण झाला असून, या वादाने आता गंभीर स्वरूप धारण केले आहे. खेलोबा मंदिरासमोर रात्रीतून उभारण्यात आलेल्या पुतळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ आणि विविध संघटनांचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. आंदोलनाच्या समर्थनार्थ राज्यभरातून धनगर समाज एकवटल्याने परिस्थिती अधिकच संवेदनशील बनली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून गावात तणावपूर्ण वातावरण कायम असून आंदोलकांनी ८ ते १० तास रस्ता रोको आंदोलन करत प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान काही ठिकाणी दगडफेक झाल्याने परिस्थिती चिघळली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला, ज्यामध्ये काही पोलीस कर्मचारी आणि आंदोलक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. गावात सध्या मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणी आंदोलक नेते लक्ष्मण हाके यांनी प्रशासनावर तीव्र टीका करत पुतळा सन्मानपूर्वक हलवण्याची मागणी केली आहे. "पुतळा हटवायचा असेल तर तो सन्मानाने काढून शासनाच्या किंवा संबंधितांच्या जागेत उभारावा आणि त्या ठिकाणी शिवसृष्टी उभारावी," अशी भूमिका त्यांनी मांडली. पुतळा काढल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या वादात स्थानिक आमदार अभिजीत पाटील यांच्यावरही आरोप करण्यात आले आहेत. हाके यांनी या प्रकरणाला "आमदारांनी पेटवलेली आग" असे संबोधत दोन समाजांमध्ये तेढ निर्माण झाल्याचा आरोप केला आहे. याला प्रत्युत्तर देताना बाळराजे आवारे-पाटील यांनी हाके यांच्यावरच समाजात भांडणे लावल्याचा आरोप केला आहे. पुतळा ज्या ठिकाणी उभारण्यात आला आहे, तो सुरक्षित असून त्याला विरोध करू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

तणावाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सतर्क झाले असून अतुल कुलकर्णी यांनी आंदोलकांशी चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. तसेच पोलीस उपअधीक्षक बसवराज शिवपुजे आणि निरीक्षक संजय जगताप यांनी आज शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करत शांततेचे आवाहन केले.

### इराणमध्ये अमेरिकन फायटर जेट कोसळले

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती आता एका अत्यंत संवेदनशील वळणावर आली आहे. इराणच्या सरकारी टीव्ही चॅनेलने दावा केला आहे की, दक्षिण-पश्चिमी इराणमध्ये अमेरिकेचे एक फायटर जेट कोसळले असून त्यातील वैमानिकाने विमानातून बाहेर उडी मारली आहे. विशेष म्हणजे, इराणने जनतेला आवाहन केले आहे की, जो कोणी या वैमानिकाला जिवंत पकडून पोलिसांच्या हवाली करेल, त्याला मोठे बक्षीस दिले जाईल. या संपूर्ण संघर्षात अमेरिकेचे विमान इराणच्या भूमीवर कोसळण्याची ही पहिलीच घटना असून, अमेरिकी माध्यमांनी या घटनेला दुजोरा दिला आहे.

# बारामतीत काँग्रेस उतरणार...

## बिनविरोधची शक्यता मावळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक आता चुरशीची होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

परंपरेप्रमाणे ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात असतानाच काँग्रेस पक्षने बारामतीसह राहुरीतही उमेदवार देण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.

पक्षश्रेष्ठींनी या निर्णयाला मंजुरी दिल्याची माहिती समोर येत असून, त्यामुळे बारामतीतील लढत आता औपचारिक न राहता थेट राजकीय प्रतिष्ठेची बनणार आहे. बारामती आणि राहुरी या दोन्ही मतदारसंघांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या त्या राज्यसभेच्या सदस्य असल्या, तरी उपमुख्यमंत्री पद कायम ठेवण्यासाठी त्यांना विधानमंडळाचे सदस्यत्व घेणे आवश्यक आहे. त्यामुळे बारामतीची ही निवडणूक अधिक महत्त्वाची ठरली आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत बारामती आणि राहुरी या जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)कडे होत्या. यावेळी या गटाने सुनेत्रा पवार यांना पाठिंबा जाहीर केला आहे. उबाठाची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्याचवेळी वंचित बहुजन आघाडी आणि राष्ट्रीय समाज पक्ष काँग्रेसच्या बाजूने उभे राहण्याचे संकेत आहेत. सुनेत्रा पवार ६ एप्रिल रोजी बारामतीत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, यावेळी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांची उपस्थिती राहणार असल्याचे सांगितले जात आहे.

## कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या; महागाईचा नवा धोका

# अमेरिकी ट्रम्प यांच्या इशाऱ्याने तेलबाजार हादरला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत असतानाच अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक इशाऱ्यामुळे जागतिक तेलबाजारात मोठी खळबळ उडाली आहे. ट्रम्प यांनी इराणला पाषाण युगात पाठवू, असा इशारा दिल्यानंतर कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढल्या असून त्याचा थेट परिणाम भारतासह जगभरातील महागाई आणि इंधन दरांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पश्चिम आशियातील तणाव वाढल्यानंतर जागतिक बाजारात ब्रेंट क्रूडच्या किमतीत मोठी उसळी दिसून आली. तेल पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती निर्माण होताच व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू केली आणि त्यामुळे किमती वाढल्या. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनी परिसरातील तणावामुळे तेल वाहतुकीबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. जगातील मोठा तेल पुरवठा या सामुद्रधुनीतून होत असल्यामुळे येथे निर्माण होणारा कोणताही तणाव जागतिक बाजाराला हादरवतो. इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्यास तेल पुरवठा विस्कळीत होऊ शकतो, अशी भीती बाजारात व्यक्त होत आहे. त्यामुळे तेल कंपन्या आणि व्यापारी आधीच साठा वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे किमती आणखी वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

या घडामोडींचा सर्वात मोठा परिणाम भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांवर होऊ शकतो. भारत आपल्या गरजेपैकी मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करतो. तेलाच्या किमती वाढल्यास पेट्रोल, डिझेल, गॅस यांचे दर वाढण्याची शक्यता असते. इंधन दर वाढले की वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम अन्नधान्य, भाजीपाला, उद्योग उत्पादन आणि सर्वसामान्य वस्तूंच्या किमतींवर होतो. त्यामुळे महागाई वाढण्याचा धोका निर्माण होतो. तज्ज्ञांच्या मते, जर पश्चिम आशियातील संघर्ष दीर्घकाळ सुरू राहिला आणि तेल पुरवठा खंडित झाला, तर कच्च्या तेलाच्या किमती आणखी वाढू शकतात. त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर, शेअर बाजारावर आणि चलन बाजारावरही होऊ शकतो. अनेक देशांमध्ये आर्थिक अस्थिरता वाढण्याची शक्यता आहे.

पश्चिम आशियातील संघर्ष, ट्रम्प यांची आक्रमक भूमिका आणि तेल बाजारातील अस्थिरता यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेसमोर नवे संकट उभे राहण्याची चिन्हे दिसत असून त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या खिशावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# राज्यातील शाळांची एकाच वेळी पटपडताळणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यातील शाळांची नियतकालिक मूल्यांकन चाचणीदरम्यान पटपडताळणी करण्यात येणार आहे. त्यानुसार ११ एप्रिल, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल या दिवशी शिक्षण विभागाचे पथक शाळांना भेट देऊन विद्यार्थी उपस्थितीचा आढावा घेऊन त्याची प्रणालीमध्ये नोंद करणार आहे. त्यासाठी नववी आणि अकरावीच्या परीक्षाही याच दिवशी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेतली जाणार आहे. दुसरी ते आठवी या इयत्तांची ११ एप्रिल, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल रोजी अनुक्रमे प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा या विषयाची परीक्षा घेतली जाणार आहे. याच काळात पटपडताळणी प्रक्रियाही राबवली जाणार आहे.इयत्ता दुसरी ते आठवीच्या वर्गाची पटपडताळणी पॅट परीक्षेच्या दिवशी म्हणजेच ११ एप्रिल, १५ एप्रिल, २२ एप्रिल रोजी करावी. इयत्ता नववीची मराठी, गणित आणि इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा ११ एप्रिल, १५ एप्रिल, २२ एप्रिल रोजी आयोजित करावी. इयत्ता अकरावीची मराठी, भौतिकशास्त्र, इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षाही याच दिवशी घेण्याच्या सूचना आहेत.

## संपादकीय

### रेवडीचे राजकारण



**निवडणुका जवळ आल्या की आश्वासनांचा पाऊस पडतो आणि सत्तेत आल्यानंतर योजनांचा. या योजनांना कोणी कल्याणकारी म्हणते, कोणी मोफत योजना म्हणते, तर कोणी रेवडी वाटप. पण हा वाद केवळ पैशांचा नसून राज्यकारभाराच्या तत्त्वज्ञानाचा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.**

भारतीय राजकारणात अलीकडच्या काळात एक नवा शब्द प्रचलित झाला आहे आणि तो म्हणजे रेवडी. उत्तर भारतात सणासुदीला वाटली जाणारी गोड रेवडी आणि निवडणुकांच्या आधी जाहीर होणाऱ्या मोफत योजनांची तुलना करून हा शब्द राजकारणात आला. त्यानंतर 'रेवडीचे राजकारण' हा शब्दप्रयोग इतका लोकप्रिय झाला की आता कोणतीही कल्याणकारी योजना जाहीर झाली की तिच्यावर लगेच रेवडीचा शिक्का मारला जातो. परंतु या चर्चेची सुरुवातच थोडी दिशाभूल करणारी आहे. कारण राज्यकारभारात अनुदाने, सवलती, सार्वजनिक सेवा, मोफत शिक्षण, अन्नधान्य, आरोग्य सुविधा या गोष्टी नवीन नाहीत. आधुनिक लोकशाही राज्याची संकल्पनाच कल्याणकारी राज्याची आहे. म्हणजे सरकार केवळ कर गोळा करून कायदा व सुव्यवस्था राखणारी यंत्रणा नसून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करणारी संस्था आहे. त्यामुळे प्रत्येक सरकारी खर्चाला रेवडी म्हणणे हा अतिसुलभीकरणाचा प्रकार ठरतो. मात्र, याचा दुसरा टोकाही तितकाच धोकादायक आहे. कोणतीही योजना जाहीर केली की ती गरीबांसाठी आहे, असे सांगून तिचे समर्थन केले जाते. पण प्रत्येक योजना गरीबांसाठीच असते असे नाही. अनेकदा अशा योजना मध्यमवर्ग किंवा विशिष्ट मतदार गट यांना लक्षात घेऊन आखल्या जातात. मोफत वीज, मोफत प्रवास, रोख मदत, कर्जमाफी या योजनांचा आर्थिक परिणाम मोठा असतो. त्यामुळे हा प्रश्न भावनेपेक्षा अर्थकारणाचा अधिक आहे. अर्थशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर सरकारचा खर्च दोन प्रकारचा असतो. एक म्हणजे भविष्यात उत्पन्न निर्माण करणारा खर्च आणि दुसरा तात्पुरता दिलासा देणारा खर्च. रस्ते, बंदरे, रेल्वे, वीज प्रकल्प, शिक्षण, आरोग्य, संशोधन या क्षेत्रांवर खर्च केला तर त्यातून अर्थव्यवस्थेची क्षमता वाढते. रोजगार वाढतो, उद्योग वाढतात आणि करसंकलन वाढते. हा खर्च गुंतवणूक मानला जातो. पण रोख मदत, मोफत सेवा, अनुदाने यामुळे तात्पुरता दिलासा मिळतो; अर्थव्यवस्थेची उत्पादन क्षमता मात्र फारशी वाढत नाही. याठिकाणी एक महत्त्वाचा सामाजिक मुद्दा आहे. गरीब माणसाला अर्थकारणाचे सिद्धांत समजावून सांगून उपयोग नसतो; त्याला तात्काळ मदत लागते. अन्न, वीज, शिक्षण, आरोग्य या मूलभूत गरजा पूर्ण न झाल्यास विकास, उद्योग, गुंतवणूक या गोष्टी निरर्थक ठरतात. त्यामुळे काही प्रमाणात कल्याणकारी योजना आवश्यक असतातच. प्रश्न योजनांचा नसून त्यांच्या मर्यादेचा आणि प्राधान्यक्रमांचा आहे. जेव्हा राजकारण विकासाच्या कल्पनांवर न लढता मोफत योजनांवर लढू लागते, तेव्हा लोकशाहीची पातळी खाली येते. मग निवडणुकीत प्रश्न असा राहात नाही की कोण रोजगार निर्माण करणार, कोण उद्योग आणणार, कोण शिक्षण सुधारणा करणार; प्रश्न असा राहतो की कोण जास्त मोफत देणार. यामुळे सरकारांची प्राधान्ये बदलतात. दीर्घकालीन पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, संशोधन यावर खर्च करण्यापेक्षा तात्काळ लोकप्रिय ठरणाऱ्या योजना जाहीर करण्याकडे कल वाढतो. कल्याणकारी राज्य आणि आश्रित राज्य यातला फरक इथे समजून घ्यावा लागतो. कल्याणकारी राज्य लोकांना सक्षम करते. शिक्षण देते, आरोग्य देते, कौशल्य देते, रोजगाराच्या संधी निर्माण करते. आश्रित राज्य लोकांना कायम मदतीवर अवलंबून ठेवते. पहिल्या प्रकारात नागरिक मजबूत होतात; दुसऱ्या प्रकारात सरकार मजबूत होते. म्हणूनच कोणतीही योजना रेवडी आहे की कल्याणकारी आहे हे ठरवण्यासाठी एक साधा निकष वापरता येतो. त्या योजनेमुळे माणूस अधिक सक्षम होतो का, की अधिक अवलंबून होतो. योजना माणसाला शिक्षण, आरोग्य, कौशल्य, उद्योग, रोजगार यासाठी मदत करत असेल तर ती गुंतवणूक आहे. जर योजना केवळ रोख मदत देऊन तात्पुरता दिलासा देत असेल तर ती खर्च आहे. आज भारतातील अनेक राज्यांची आर्थिक परिस्थिती पाहिली तर हा प्रश्न गंभीर वाटू लागतो. कर्ज वाढत आहे, महसुली तूट वाढत आहे आणि त्यातील मोठा हिस्सा अनुदान व सवलतींवर खर्च होत आहे. यामुळे भविष्यात पायाभूत सुविधा आणि विकासासाठी पैसे कमी पडण्याची शक्यता निर्माण होते. लोकशाहीत सरकार लोकांच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. पण सरकारने केवळ अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अर्थकारण बिघडवले तर त्याची किंमत पुढील पिढ्यांना मोजावी लागते. लोकांना आधार देतानाच त्यांना सक्षम बनवणे, तात्पुरता दिलासा देतानाच दीर्घकालीन विकास साधणे आणि लोकप्रियता मिळवतानाच आर्थिक शिस्त राखणे, हे संतुलन साधणे म्हणजेच राज्यकारभार होय. रेवडीचे राजकारण थांबवणे हा प्रश्न नाही; ते मर्यादेत ठेवणे हा खरा प्रश्न आहे. रेवडी वाटणारे राज्य आणि भविष्य घडवणारे राज्य यातला फरक समाजाने ओळखला पाहिजे.

# साम्राज्याला राजा नव्हे, तर सहमती लागते



जगभरातील राजकारणात सध्या एक विचित्र प्रवृत्ती दिसते. कोणत्याही देशातील राजकीय किंवा आर्थिक समस्यांचे कारण म्हणून एखाद्या व्यक्तीला दोष दिला जातो. एखादा नेता गेला की सर्व काही बदलेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. पण इतिहास आणि राज्यशास्त्र या दोन्ही गोष्टी सांगतात की व्यवस्था व्यक्तींवर चालत नाही. व्यवस्था चालते ती संस्थांवर, हितसंबंधांवर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहमतीवर.

राज्यव्यवस्था म्हणजे केवळ सरकार नव्हे. त्यात नोकरशाही, न्यायव्यवस्था, उद्योग, माध्यमे, आंतरराष्ट्रीय संबंध, सुरक्षा यंत्रणा, आर्थिक संस्था आणि समाजातील प्रभावशाली घटक यांचा समावेश असतो. या सर्व घटकांची एक प्रकारची सहमती तयार झाली की धोरणे टिकतात आणि सत्तेची दिशा ठरते. त्यामुळे कोणताही नेता कितीही शक्तिशाली असला तरी तो पूर्णपणे स्वतंत्रपणे राज्य चालवू शकत नाही. त्याला या सर्व घटकांची उघड किंवा निःशब्द सहमती लागते. लोकशाहीतील मोठा गैरसमज असा असतो की निवडणुका म्हणजे लोकशाही. प्रत्यक्षात निवडणुका हा लोकशाहीचा एक भाग आहे; संपूर्ण लोकशाही नव्हे. लोकशाही म्हणजे मजबूत संसद, स्वतंत्र न्यायव्यवस्था, स्वायत्त संस्था, मुक्त माध्यमे आणि सक्रिय विरोधी पक्ष. या संस्था मजबूत असतील तर लोकशाही मजबूत राहते. या संस्था कमकुवत झाल्या तर निवडणुका होत असल्या तरी लोकशाही कमकुवत होते.

अनेक देशांमध्ये असे दिसून आले आहे की लोकशाही अचानक संपत नाही. एखादा लष्करी बंड होतो आणि दुसऱ्या दिवशी लोकशाही संपते, असे आजच्या काळात क्वचित घडते. लोकशाही हळूहळू कमकुवत होते. संसदेतील चर्चा कमी होते, अध्यादेश वाढतात, माध्यमांवर दबाव वाढतो, विरोधक कमकुवत होतात, चौकशी संस्था राजकीय वादात अडकतात आणि लोकशाही हळूहळू निवडणूक व्यवस्थेत बदलते. बाहेरून लोकशाही दिसते, पण आतून तिची ताकद कमी होत जाते. याठिकाणी सहमती हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. कोणत्याही मोठ्या आर्थिक किंवा राजकीय धोरणासाठी समाजातील प्रभावशाली घटकांची सहमती आवश्यक असते. उदाहरणार्थ, मोठ्या आर्थिक सुधारणा करायच्या असतील तर उद्योग, वित्तीय संस्था, आंतरराष्ट्रीय बाजार आणि सरकार यांच्यात एक प्रकारची समजूत तयार होते. परराष्ट्र धोरणातही सरकार बदलले तरी देशाची भूमिका फारशी बदलत नाही, कारण ती भूमिका संस्थात्मक सहमतीतून तयार झालेली असते. म्हणूनच अनेक देशांमध्ये सरकार बदलले तरी आर्थिक धोरणे, परराष्ट्र धोरण, सुरक्षा धोरण या बाबतीत सातत्य दिसते. राजकारणी बदलतात, पक्ष बदलतात, घोषणाबाजी बदलते; पण राज्याची दिशा फारशी बदलत नाही. कारण राज्यव्यवस्था ही एखाद्या व्यक्तीची मालमत्ता नसते. ती अनेक शक्तींच्या संतुलनातून चालते. यामुळे राजकारणातील व्यक्तिपूजा आणि व्यक्तीद्वेष या दोन्ही गोष्टी धोकादायक ठरतात. एखादा नेता सर्व समस्या सोडवेल हा समज जितका चुकीचा, तितकाच एखादा नेता सर्व समस्या निर्माण करतो हा समजही चुकीचा. कारण समस्या आणि उपाय दोन्ही व्यवस्थेत असतात, व्यक्तीत नव्हे. भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. येथे सरकारे बदलतात, पण प्रशासनाची रचना, कायदे, आर्थिक धोरणांचा मार्ग, करप्रणाली, नोकरशाहीची पद्धत या गोष्टी मोठ्या प्रमाणात कायम राहतात. त्यामुळे देशाची दिशा ठरवणारे घटक केवळ

**» लोकशाही व्यवस्थेचा सर्वात मोठा धोका एखादा शक्तिशाली नेता नसतो, तर समाजातील विविध घटकांची शांत सहमती असते. सत्ता कोणाच्या हातात आहे यापेक्षा सत्ता कशी चालते हा प्रश्न अधिक महत्त्वाचा असतो.**

राजकारणी नसतात; तर संपूर्ण व्यवस्था असते.

लोकशाही मजबूत करायची असेल तर निवडणुका जिंकणे पुरेसे नसते. संसदेत चर्चा होणे, समित्या काम करणे, कायदे नीट तपासले जाणे, न्यायव्यवस्था स्वतंत्र राहणे, माध्यमांनी प्रश्न विचारणे आणि विरोधी पक्ष सक्षम असणे या गोष्टी आवश्यक असतात. लोकशाही ही केवळ सरकारची व्यवस्था नसून ती समाजाची सवय असते.

आज जगभरात लोकशाहीसमोर सर्वात मोठे आव्हान हुकूमशहा नसून लोकशाही संस्थांची कमकुवत होत चाललेली रचना आहे. संस्था कमकुवत झाल्या की सत्ता अधिक केंद्रीत होते. सत्ता केंद्रीत झाली की निर्णय जलद होतात; पण त्यात चर्चा कमी होते आणि चुका होण्याची शक्यता वाढते. राजकारणात नेते महत्त्वाचे असतात, पण ते सर्वकाही नसतात. व्यवस्था, संस्था, परंपरा, कायदे आणि सार्वजनिक सहमती या गोष्टी अधिक महत्त्वाच्या असतात. एखादा राजा साम्राज्य उभे करू शकतो, पण साम्राज्य टिकवण्यासाठी समाजातील विविध घटकांची सहमती आवश्यक असते. लोकशाहीतही हेच लागू होते. लोकशाही एखाद्या नेत्यामुळे टिकत नाही; ती टिकते ती संस्थांमुळे, नियमांमुळे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकांच्या सहमतीमुळे. त्यामुळे लोकशाहीचे भविष्य एखादा नेता कोण आहे यावर ठरत नाही; तर लोकशाही संस्था किती मजबूत आहेत यावर ठरते. प्रश्न व्यक्तींचा नसतो, व्यवस्थेचा असतो. आणि म्हणूनच कोणत्याही साम्राज्याला किंवा लोकशाहीला राजा लागत नाही; लागते ती सहमती.

## महसूलवाढीच्या बळावर शहर सक्षम करणार

### महापौर रवि लांडगे यांचा निर्धार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड पालिकेच्या महसूलवाढीच्या बळावर शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि सार्वजनिक सेवांची गुणवत्ता उंचावण्याचा निर्धार महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केला. करदात्यांच्या सहकार्यामुळेच विकासकामांना गती मिळत असल्याचे सांगत त्यांनी नागरिकांचे आभार मानले.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, समिती सभापती कैलास कुटे, उपआयुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, राजेश आगळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

महापौर लांडगे म्हणाले की, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये नागरिकांनी वेळेत कर भरून जबाबदारी पार पाडली असून, यामुळे महापालिकेला विविध विकास प्रकल्प प्रभावीपणे राबवता आले. करातून मिळणारा निधी नागरिकांच्या कल्याणासाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी वापरण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मालमत्ता कर, पाणीकर, अग्निशमन सेवा शुल्क, झोपडपट्टी सेवाकर, बांधकाम परवानगी शुल्क आणि आकाशचिन्ह परवाना शुल्क अशा विविध माध्यमांतून महसूल वाढीसाठी सुयोग्य नियोजन करण्यात आले. ऑनलाईन कर भरणा, सवलत योजना आणि सुलभ सेवा यामुळे कर संकलनात लक्षणीय वाढ झाल्याचे महापौरांनी सांगितले. करप्रक्रिया अधिक पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या अत्यावश्यक सेवांच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्यावर महापालिकेचा भर राहणार आहे. आगामी काळात शहर अधिक स्मार्ट आणि सक्षम करण्यासाठी विविध विकासकामांना गती देण्यात येणार असल्याचेही लांडगे यांनी सांगितले.

महापालिकेच्या करसंकलन व कर आकारणी विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ९६१ कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता कर वसूल करत सलग दुसऱ्यांदा साडेनऊशे कोटींचा टप्पा पार केला आहे. थकबाकीदारांवर कठोर कारवाई, व्यापक जनजागृती आणि अभय योजनेला मिळालेला प्रतिसाद यामुळे महसुलात मोठी वाढ झाली. निवडणूक प्रक्रियेचे काही अडथळे असूनही प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाल्याचे महापौरांनी नमूद केले.

## योजना न राबविणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेची अंमलबजावणी टाळणाऱ्या समाविष्ट खासगी रुग्णालयांवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आयोजित विभागीय आढावा बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या.

आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना या योजनांची विभागीय आढावा बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीस पुणे, नाशिक, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील क्षेत्रीय व्यवस्थापक, जिल्हा समन्वयक तसेच प्रशासक प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी, रुग्णालयांकडून येणाऱ्या तक्रारी, रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा आणि प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. काही समाविष्ट खासगी रुग्णालये या योजनांअंतर्गत रुग्णांना उपचार देण्यास टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेण्यात आली.

आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सर्व जिल्ह्यांनी आपल्या पालकमंत्र्यांची वेळ घेऊन योजनांचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करावी, अशा सूचना दिल्या.

## महापौरांचे प्रशासनाला आदेश; जनसामान्यांना त्रास होऊ नये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरात झालेल्या अवकाळी पावसामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागल्यानंतर महापौर रवि लांडगे यांनी महापालिका प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. रस्त्यांवरील सुरू असलेली खोदकामे, अपूर्ण कामे, खड्डे तसेच अपुऱ्या पाणी निचऱ्यामुळे अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.

या पार्श्वभूमीवर महापौरांनी आयुक्तांना तातडीने परिस्थितीचा आढावा घेऊन नागरिकांना त्रास होणार नाही, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. शहरातील प्रमुख रस्ते तसेच अंतर्गत रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि खराब रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

शहरात विकासकामांमुळे सुरू असलेली खोदकामे सुरक्षितरीत्या बंदिस्त करून रस्ते पूर्वस्थितीत आणावेत, असे महापौरांनी सांगितले. साचलेले पाणी तातडीने काढण्यासाठी पंपिंग यंत्रणा कार्यान्वित करावी. प्रमुख चौक, पूल, अंडरपास आणि सखल भागात विशेष पथके नियुक्त करून सतत देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद मिळावा यासाठी २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## उपमहापौर शर्मिला बाबर यांनी दिले इतिहासाचे धडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर कक्षात उर्दू माध्यमिक विद्यालय, रुपीनगर येथील विद्यार्थी आणि शिक्षकांनी स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी भेट देत अनोखा शैक्षणिक अनुभव घेतला. या भेटीदरम्यान उपमहापौर शर्मिला बाबर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शहराच्या इतिहासाचा वेध घेतला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जिज्ञासेला चालना देण्यासाठी आयोजित या उपक्रमात प्रशासनाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली. शर्मिला बाबर यांनी पिंपरी चिंचवडच्या औद्योगिक विकासाची वाटचाल, स्थलांतरित लोकसंख्येमुळे झालेली वाढ आणि नियोजनबद्ध



नागरीकरणामुळे शहराने साधलेली प्रगती याचे सोप्या भाषेत विवेचन केले. तसेच महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लोकाभिमुख योजना, मूलभूत सुविधा आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या भेटीत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत शहरातील पायाभूत सुविधा, शिक्षण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यांसंदर्भात प्रश्न विचारले. या चर्चेमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांविषयी जागरूकता निर्माण झाल्याचे दिसून आले.

यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांची रचना आणि कार्यपद्धती याविषयी सविस्तर माहिती दिली. करसंकलन, आरोग्य, बांधकाम परवाने, पाणीपुरवठा आणि स्वच्छता अशा विभागांमार्फत शहराचा कारभार कसा चालतो, याचे त्यांनी उदाहरणांसह स्पष्टीकरण केले.

या भेटीत शिक्षक समितीचे अध्यक्ष अशफाक शेख, शिक्षक मोहम्मद आतिफ फैजल, शिक्षिका ताहेरा शेख तसेच विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा शैक्षणिक भेटी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरत असल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्थानिक इतिहासासोबतच नागरी प्रशासनाची प्रत्यक्ष ओळख होण्यास मदत झाली.

### बँकॉक-म्यानमार कनेक्शन, तिघे अटकेत;२.०९ कोटींची फसवणूक; नवी मुंबईत नवीन कॉल सेंटर उभारण्याचा कट उधळला

## आंतरराष्ट्रीय सायबर फसवणूक रॅकेटचा भंडाफोड

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** शेअर व आयपीओ गुंतवणुकीतून मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर टोळीचा पर्दाफाश करण्यात पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांना मोठे यश आले आहे. या प्रकरणी नवी मुंबईतील अकाऊंट धारकासह पश्चिम बंगाल आणि पंजाबमधील एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सायबर पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यानुसार, आरोपींनी 'प्लेसमेंट' व 'इंटर्नशिप' देणाऱ्या कंपनीच्या मालकाला शेअर व आयपीओमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. विश्वास संपादन करून आरोपींनी फिर्यादीकडून विविध कारणे सांगत तब्बल २ कोटी ९ लाख ३० हजार ५३७ रुपयांची फसवणूक केली. मात्र कोणताही परतावा न दिल्याने फिर्यादीने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



तपासादरम्यान सेंट्रल बँक ऑफ इंडियातील एका खात्यात व्यवहार झाल्याचे आढळून आले. हे खाते नवी मुंबईतील 'आरशिल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड' या नावावर असल्याचे समोर आले. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी नवी मुंबई गाठून सुशिल भगवान जुवाटकर (वय ४२, रा. नेरुळ) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने हे खाते आपल्या साथीदार पंकज राज कपुर (वय ३८, मुळ जालंधर, पंजाब) आणि निश्चल टंकबीर बरेयली (वय २७, मुळ दार्जिलिंग, पश्चिम बंगाल) यांच्यासह वापरल्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी या दोघांनाही अटक केली. चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली असून आरोपींनी बँकॉक व म्यानमार येथे सायबर फसवणुकीच्या कॉल सेंटरमध्ये काम केल्याचे उघड झाले. तसेच नवी मुंबईत नवीन कॉल सेंटर सुरू करून अशाच प्रकारे फसवणूक करण्याचा त्यांचा कट होता. कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींकडून ६ मोबाईल फोन, ३ पासपोर्ट, २ लॅपटॉप, २ हार्डडिस्क, ३ पॉस मशीन, क्यूआर कोड स्कॅनर, २४ बँक खाते उघडण्याची किट, ५ डेबिट कार्ड आणि इतर साहित्य असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. याशिवाय फिर्यादीचे ६२ लाख रुपये गोठवण्यात पोलिसांना यश आले आहे.

ही कारवाई पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिसांच्या पथकाने केली असून, पुढील तपास सुरू आहे.

## हिंजवडीत महिलेवर अत्याचार सात महिन्यांनी गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** हिंजवडी परिसरात एका महिलेवर जबरदस्तीने अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास मारुंजी रोड परिसरातील एका घरात घडली होती. या प्रकरणी सात महिन्यांनंतर दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पीडित महिलेने हिंजवडी पोलिस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेच्या मुलीने आरोपींपैकी एका व्यक्तीसोबत नोंदणी पद्धतीने विवाह केला होता. त्यानंतर आरोपींकडून पारंपरिक पद्धतीने लग्न करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, लग्नानंतर मुलीला सासरी नेण्यात आले नाही.

लग्न रद्द करण्यासाठी आरोपींकडून दोन फ्लॅट आणि दोन दुकाने देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. मात्र, पीडित महिलेने मुलीला सासरी नांदवण्यासाठी घेऊन जाण्याची मागणी केली. याबाबत चर्चा करण्यासाठी महिला आरोपींच्या घरी गेली असता, तेथे दोन जणांनी तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच मुलीसोबत लग्न करणार नसल्याचे सांगत आरोपींनी महिलेला जीवे मारण्याची धमकी दिली आणि तिचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बिबट्याच्या तरुणावर हल्ल्याने दहशत

**लोणी-धामणी :** धामणी येथे बिबट्याच्या हल्ल्याची धक्कादायक घटना घडली असून एका तरुणाला गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील अक्षय फकीरा विधाटे (वय २८) हा गुरुवारी (दि. ०२) रात्री सुमारे आठ ते नऊ वाजण्याच्या दरम्यान लोणी-धामणी रस्ता मार्गे लोणीवरून धामणीकडे येत असताना अचानक बिबट्या समोर आला आणि त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अक्षय विधाटे यांच्या उजव्या पायाला बिबट्याच्या पंज्याने गंभीर जखम झाली. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत त्याला प्राथमिक आरोग्य केंद्र, धामणी येथे दाखल केले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकारी नीलम चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्यात आला. वनकर्मचारी यांच्या मदतीने जखमी तरुणाला पुढील उपचारासाठी मंचर ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले.

### सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांचे स्वागत

**पारगाव :** पारगाव (कारखाना) पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांची बदली झाल्यानंतर नव्याने प्रभारी अधिकारी म्हणून सचिन कांडगे यांनी पदभार स्वीकारला. यानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून स्वागत करण्यात आले. सचिन कांडगे यांनी यापूर्वी गडचिरोली येथे कार्यरत असताना नक्षलग्रस्त भागात उल्लेखनीय कार्य केले आहे. नव्याने पारगाव पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांच्या हस्ते सचिन कांडगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ह.भ.प. निवृत्ती महाराज लोखंडे, बजरंग देवडे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सचिन कांडगे यांच्या कार्याची प्रशंसा करत पारगाव परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम राहील, असा विश्वास व्यक्त केला आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

### पीएमआरडीए प्रशासनाची पोलिस बंदोबस्तात शेडवर कारवाई

# चांडोली टोलनाक्यावर कारवाईचा हातोडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** चांडोली येथील टोलनाक्यालगत असलेल्या जागेवरील शेडवर गुरुवारी (दि. २) अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) प्रशासनाने मोठ्या पोलिस बंदोबस्तात ही कारवाई केली.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोगाकडे करण्यात आलेल्या वैयक्तिक तक्रारीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, ही कारवाई एकतर्फी आणि अचानक झाल्याचा आरोप करत रिपाइं (आठवले) श्रमिक ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोष डोळस यांनी पीएमआरडीए आणि पोलिस प्रशासनाचा जाहीर निषेध केला आहे.

कारवाईदरम्यान मोठ्या पत्रा शेडसह येथील सहा व्यावसायिकांच्या दुकानांमधील वस्तूंची मोडतोड झाली. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे. अल्पावधीतच दुकानं रिकामी करण्याचे आदेश दिल्यामुळे दुकानातील वस्तू व साहित्य इतरत्र हलवण्यासाठी व्यावसायिकांची मोठी तारांबळ उडाली.

अतिक्रमण कारवाईदरम्यान रस्ता रोको किंवा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पीएमआरडीए आणि खेड पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. दोन जेसीबीच्या साहाय्याने अतिक्रमण काढण्यात आले. काही वेळानंतर ही कारवाई थांबविण्यात आली. पोलिसांना चैत्री पौर्णिमा (यात्रा) आणि इतर बंदोबस्त असल्याने तसेच व्यावसायिकांना साहित्य हलविण्यास वेळ मिळावा यासाठी कारवाई तात्पुरती थांबविण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र उर्वरित कारवाई लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

पीएमआरडीए आणि पोलीस अधिकारी यांनी जशी आमच्यावर कारवाई झाली तशीच इतरांवरही कारवाई केली पाहिजे. लाचखोर अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून ही कारवाई केली आहे. तीन महिने तक्रार करूनही आमच्यावरच कारवाई करण्यात आली. अनुसूचित जाती-जमाती आयोगाचा आणि या कारवाईचा काही संबंध नाही. संबंधित आदेशांची पडताळणी न करता कारवाई करण्यात आली. भाडेकरू व्यावसायिकांवर अन्याय झाला आहे, असे संतोष डोळस, रिपाइं श्रमिक ब्रिगेड, पुणे जिल्हाध्यक्ष यांनी म्हटले आहे.

या पूर्वी दोन वेळा अतिक्रमण कारवाई प्रस्तावित झाली होती. मात्र पोलीस बंदोबस्त आणि तांत्रिक कारणांमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती. गेल्या आठ महिन्यांपासून येथील अतिक्रमण हटवण्याची प्रक्रिया सुरू होती. ३० मार्च रोजी पंचनामा करून त्याचा अहवाल पुढे सादर करण्यात आला होता. व्यावसायिकांना नोटीसद्वारे कारवाईबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. ही नियोजित कारवाई होती, असे रविंद्र राजने, तहसीलदार, पीएमआरडीए यांनी स्पष्ट केले आहे.

## वळतीत गव्हाचे मोठे नुकसान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** वळती परिसरात गुरुवारी (दि. २) दुपारनंतर अचानक झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपीट आणि मुसळधार पावसामुळे विशेषतः गहू पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अनेक ठिकाणी उभे पीक भुईसपाट झाले आहे.

वळतीसह गांजवेवाडी, नागापूर, रांजणी, थोरांदळे आणि खडकी या गावांतील शेतकऱ्यांचे गव्हाचे पीक अजूनही शेतातच असल्याने नुकसान अधिक वाढले आहे. आधीच दाणे भरलेले असताना अचानक आलेल्या पावसामुळे कणसे तुटणे, गव्हाचे पीक आडवे होणे आणि दाणे काळे पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

दरवर्षी या परिसरात गव्हाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते आणि विक्रीतून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक लाभ मिळतो. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण गणित कोलमडले आहे. उत्पादन घटण्यासोबतच बाजारभावावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी गव्हाचे पीक पूर्णपणे आडवे पडले, गारपीटीमुळे कणसांचे तुकडे झाले, पावसामुळे शेतात चिखल निर्माण होऊन मळणी प्रक्रियेत अडथळे अशा पद्धतीने पिकाचे नुकसान झाले. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले असून प्रशासनाने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी पुढे येत आहे.

## घोडेगावमध्ये हनुमान जन्मोत्सवानिमित्त शोभायात्रा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** हनुमान जन्मोत्सव निमित्त गुरुवारी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल घोडेगाव प्रखंड व सर्व संलग्न संस्थांच्या वतीने घोडेगाव शहरामध्ये भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत हजारो हिंदू बांधव आणि भगिनी सहभागी झाल्या होत्या.

गुरुवारी सायंकाळी बाजारपेठेतील हनुमान मंदिर येथून शोभायात्रेला सुरुवात झाली. या यात्रेमध्ये तरुणाईचा मोठा सहभाग होता. ढोल-ताशांच्या गजरात आणि “जय श्रीराम”च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. शोभायात्रेच्या अग्रभागी धर्मध्वज होता. या भव्य शोभायात्रेत शौर्य संचलन, श्री बजरंग बली, श्री प्रभू श्रीराम, गोमाता तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे रथांसह विविध धार्मिक देखावे सादर करण्यात आले.

यात्रेतील मुख्य आकर्षण बजरंग बलीचा गेटअप करून करण्यात आलेले लाईव्ह प्रदर्शन होते. शोभायात्रेचे आयोजन सागर शरद काळे, श्रीकांत सूर्यवंशी, अक्षय कुलकर्णी, गणेश कोरडे, कृष्णा नवले, अक्षय नंदकर, अनिकेत काळे, सुशांत काळे, निमिश शिंदे, साहिल जांभळे, सनी शेटे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केले. यावेळी महेश थोरात, गणेश राऊत, सागर भोर, चेतन थोरात आदी उपस्थित होते.

दरम्यान, घोडेगाव येथील जुने दत्त मंदिर व सुतार समाज येथेही हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सायंकाळी भजन कार्यक्रम तसेच ग्रामस्थांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## २१ भूमिहीन कुटुंबांचे घरकुल स्वप्न पूर्णत्वाकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** वळती गावात तब्बल २१ भूमिहीन कुटुंबांना हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून ‘एकलव्यनगर’ या स्वरूपात हा उपक्रम वेगाने आकार घेत आहे. पंतप्रधान घरकुल आवास योजना व रमाई माता घरकुल योजना यांच्या माध्यमातून या कुटुंबांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायतीने विशेष पुढाकार घेतला आहे. या घरकुलांचे बांधकाम सध्या जलद गतीने सुरू असून लवकरच लाभार्थी कुटुंबे स्वतःच्या घरात राहायला जाणार आहेत, अशी माहिती ग्रामपंचायतचे सरपंच तथा प्रशासक आनंद वसंत वाव्हळ यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून वळती गावातील भिल्ल, बौद्ध, चर्मकार तसेच इतर समाजातील अनेक कुटुंबे स्वतःची जागा नसल्यामुळे घरांपासून वंचित होती. जागेअभावी शासनाच्या घरकुल योजनांचा लाभही त्यांना मिळत नव्हता. ही समस्या लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने गावच्या गायरान जागेतून या कुटुंबांना घरकुल देण्याचा निर्णय घेतला. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने एकूण २१ घरकुलांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

या घरकुल बांधकामाचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला असून सध्या बांधकाम प्रगतीपथावर आहे. दर्जेदार साहित्य, भक्कम बांधकाम व आवश्यक सुविधा यावर ग्रामपंचायत विशेष लक्ष देत आहे. या संपूर्ण वसाहतीला ‘एकलव्यनगर’ असे नाव देण्यात आले आहे.

याबाबत सरपंच आनंद वाव्हळ म्हणाले, “गावातील भूमिहीन कुटुंबांना स्वतःचे घर मिळावे, ही ग्रामपंचायतीची सामूहिक इच्छा होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने गायरान जागेत ही घरे उभी करत आहोत. शासनाच्या घरकुल योजनांचा लाभ मिळवून देत ही कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण केली जातील.”

वळती ग्रामस्थांच्या सहकार्याने साकारत असलेला ‘एकलव्यनगर’ हा गावाच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असून भूमिहीन कुटुंबांचे घराचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होत आहे. शासनाच्या योजनांचा प्रभावी वापर, ग्रामपंचायतीचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय आणि ग्रामस्थांचे सहकार्य यामुळे सामाजिक न्यायाची प्रक्रिया प्रत्यक्षात उतरू लागली आहे.

## कौटुंबिक वादातून मुलीच्या खुनाचा प्रयत्न; मुलासह विहिरीत उडी, मुलाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर येथे कौटुंबिक वादातून एका महिलेने तेरा वर्षीय मुलीचा गळा आवळून खून करण्याचा प्रयत्न केल्यानंतर सहा वर्षांच्या मुलाला सोबत घेऊन विहिरीत उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत मुलाचा मृत्यू झाला असून संबंधित महिला बचावली आहे. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

निहांत आशिष बाणखेले (वय ६) असे मृत मुलाचे नाव असून परिज्ञा आशिष बाणखेले (वय १३) हिच्यावर उपचार सुरू आहेत. हर्षदा आशिष बाणखेले (वय ३५) हिच्याविरोधात मंचर पोलीस ठाण्यात खून व खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती-पत्नीमध्ये वारंवार भांडणे होत होती. दोन-तीन महिन्यांपूर्वी वाद वाढल्यानंतर पती-पत्नी वेगळे राहत होते. पती आई-वडिलांकडे राहत होता, तर हर्षदा बाणखेले ही मंचर येथील लालबाग प्रेस्टिज परिसरात दोन मुलांसह राहत होती. पतीसोबत तिचा वाद सुरूच होता. गुरुवारी सकाळी साडेआठच्या सुमारास हर्षदा बाणखेले हिने वायरच्या साहाय्याने मुलगी परिज्ञा हिचा गळा आवळून खून करण्याचा प्रयत्न केला. तसेच तिला लाथाबुक्यांनी मारहाण केली. गळा आवळल्यामुळे परिज्ञा बेशुद्ध पडली. ती मृत झाल्याचा समज करून महिलेने घराला बाहेरून कुलूप लावले. त्यानंतर सहा वर्षांचा मुलगा निहांत याला सोबत घेऊन ती स्कुटीवरून मंचर शहरालगत असलेल्या तपनेश्वर स्मशानभूमीलगतच्या विहिरीवर गेली. मुलाचा जीव घेण्याच्या उद्देशाने तिने मुलासह विहिरीत उडी मारली. पाण्यात बुडून निहांत याचा मृत्यू झाला. मात्र महिलेच्या हाताला विहिरीतील पाईप लागल्याने ती बचावली.

तपनेश्वर स्मशानभूमीत दशक्रिया विधी सुरू असताना एकजण विहिरीजवळ गेला असता त्याच्या लक्षात हा प्रकार आला. त्याने आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक जमा झाले. संजय बाणखेले यांनी मदतीसाठी विहिरीत उडी टाकली. नगरसेवक वसंतराव बाणखेले, गणेश बाणखेले व ग्रामस्थांनी मदतकार्य करून दोघांना विहिरीतून बाहेर काढले आणि उपचारासाठी मंचर उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. तेथे डॉक्टरांनी निहांत याला मृत घोषित केले. घराचे कुलूप काढून पाहणी केली असता मुलगी परिज्ञा ही जखमी अवस्थेत घरात आढळून आली. तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी महिलेचा पती आशिष लक्ष्मण बाणखेले यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून त्यानुसार हर्षदा बाणखेले हिच्याविरोधात खून व जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वडगाव आनंद येथे सांस्कृतिक कला महोत्सव उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**ओतूर :** वडगाव आनंद येथील आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन ‘कलादर्पण २०२६’ उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विविध संस्कृतींचे दर्शन घडवणारे कार्यक्रम आणि विद्यार्थ्यांच्या गुणदर्शनामुळे यंदाचा सोहळा विशेष ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते डी. बी. वाळुंज यांनी प्रास्ताविक केले, तर छाया डुंबरे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य मंगेश अण्णा काकडे, माजी पंचायत समिती सदस्य जीवन शिंदे, सरपंच रेलिका जाधव, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष तानाजी देवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

‘कलादर्पण २०२६’ अंतर्गत विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटक, एकांकिका आदी कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गरबा, लावणी, आदिवासी नृत्य, रेट्रो, वारी, ऑपरेशन सिंदूर, छावा अशा विविध विषयांवरील नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाला रंगत आणली. गणेश वंदनेने सुरू झालेला कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. तसेच सुमारे २० बक्षिसांचा समावेश असलेल्या लकी ड्रॉ उपक्रमास महिला वर्गाचा मोठा प्रतिसाद मिळाला. पालकांच्या सहकार्याने सादर करण्यात आलेल्या ‘इलेक्ट्रिक कुंपण’ या बिबट्यापासून संरक्षणावर आधारित नाटिकेतून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थी व पालकांसाठी स्नेहभोजनाचेही आयोजन करण्यात आले होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील, शिक्षणप्रेमी डी. बी. वाळुंज, शाळेचे मुख्याध्यापक सुनील ठिकेकर, शिक्षक सुनंदा तांबे, गीतांजली वाळुंज व सविता खेत्री यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## विहिरीत पडलेल्या बिबट्याला वाचवले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** पिंपळगाव खडकी येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभाग व रेस्क्यू पथकाने मोठ्या शिताफीने बाहेर काढून जीवदान दिले. अशी माहिती मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली.

आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव खडकी येथील शेतकरी राजेंद्र निवृत्ती बांगर आणि स्वप्निल शिवाजी बांगर हे जनावरांसाठी चारा काढण्यासाठी विहिरीशेजारील शेतात गेले असता त्यांना गुरगुरण्याचा आवाज आला. आवाजाचा मागोवा घेतला असता विहिरीच्या कपारीमध्ये बिबट्या बसलेला दिसून आला. शिवाजी ठकाजी बांगर यांच्या विहिरीत पहाटेच्या सुमारास बिबट्या पडल्याचे त्यावेळी लक्षात आले.

घटनेची माहिती तात्काळ वनविभागाला देण्यात आली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी वनविभागाचे कर्मचारी व रेस्क्यू पथक तातडीने घटनास्थळी पाठविले. त्यानंतर बचावकार्य सुरू करण्यात आले.

रेस्क्यू पथकाने सुरक्षित पद्धतीने पिंजरा व दोरांच्या सहाय्याने बिबट्याला विहिरीतून बाहेर काढले. काही वेळाच्या प्रयत्नांनंतर बिबट्याला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ नागरिकांची गर्दी झाली होती.

वनविभागाने नागरिकांना जंगल परिसरात किंवा शेतात जाताना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, वन्यप्राणी आढळल्यास तात्काळ वनविभागाला माहिती द्यावी, असेही सांगितले.

### पावसाळ्यापूर्वीच रस्त्याची दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी

# दावडी रस्त्याची चाळण; खड्ड्यांमुळे बससेवा बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** राजगुरुनगर तालुक्यातील चिंचोशी ते दावडी या महत्त्वाच्या रस्त्याची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत चालली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यापूर्वीच रस्त्याची ही अवस्था झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या रस्त्यावरून येणारी-जाणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) बससेवा पूर्णपणे बंद झाली आहे.

खोल खड्डे, उघडी पडलेली खडी आणि निसरडा रस्ता यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. शालेय विद्यार्थी, रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांना या खडतर प्रवासाचा सर्वाधिक फटका बसत आहे. चिंचोशी व दावडी या दोन प्रमुख गावांना जोडणारा हा रस्ता परिसरातील दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र सध्या रस्त्यावर डांबर शोधण्याची वेळ आली असल्याचे चित्र आहे.

याप्रसंगी स्थानिक ग्रामस्थ, विद्यार्थी आणि लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तीव्र रोष व्यक्त केला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य व बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सयाजी मोहिते, संभाजी घारे, भाऊसाहेब होरे, दत्तात्रय दरगुडे, देवानंद निकम आदी उपस्थित होते.

ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधींवर दुर्लक्ष करण्याचा आरोप करत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. आम्ही नियमित कर भरतो, तरीही आम्हाला साध्या मूलभूत सुविधाही मिळत नाहीत, असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला. याबाबत जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील यांनी सांगितले की, रस्ता खड्डेमय झाल्याने एसटी बससेवा बंद झाली आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून विशेषतः विद्यार्थिनींना खाजगी वाहनाने कॉलेजला जावे लागत आहे. संबंधित अधिकाऱ्यांना रस्ता दुरुस्तीच्या सूचना दिल्या असून एसटी प्रशासनालाही बससेवा पूर्ववत करण्याबाबत कळवले आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्याचे डांबरीकरण किंवा दुरुस्ती केली नाही तर भविष्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्थानिक ग्रामस्थांनी दिला आहे.

## लोणी येथे आरोग्य शिबिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी ग्रामपंचायत, अनुगामी लोकराज्य अभियान-अनुलोम, डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद हॉस्पिटल आणि समर्थ फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी येथील महादेव मंदिरात भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. बुधवारी झालेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराच्या प्रारंभी भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी सरपंच सावळेराम नाईक, महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा भाजपाच्या सचिव कविता हिंगे, अनुलोम शिरूर उपविभाग प्रमुख सुरेश भूजबळ, भाजप पूर्व मंडल अध्यक्ष किरण वाळुंज, अनिता डफळ, उपसरपंच राजेंद्र वाळुंज, प्राथमिक आरोग्य केंद्र धामणीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मीरा खलते, डॉ. भास्कर भोसले, डॉ. चंद्रकांत देशमुख, समाजभूषण कैलास गायकवाड, उद्योजक सुधीर सोनार, निवेदक जगन लंके आणि गटप्रवर्तक शीतल काकडे उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १८९ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६८ जणांची मोफत नेत्रतपासणी करून त्यांना चष्म्यांचे वितरण करण्यात आले. तसेच २१ जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया येत्या सोमवारी डी. वाय. पाटील येथे मोफत करण्यात येणार आहे.

## सारांश वृत्त

### फटाके बनवत असताना स्फोट

**भुवनेश्वर:** ओडिशाच्या नयागढ जिल्ह्यात शुक्रवारी एका सणासाठी फटाके तयार करत असताना झालेल्या स्फोटात एका अल्पवयीन मुलासह किमान सहा जण गंभीररित्या भाजले, अशी माहिती पोलिसांनी दिली. ही घटना नुवागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोराडा गावात घडली. अग्निशमन दल आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी गेले आणि त्यांनी जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.

### अयोध्या सॉफ्ट पॉवरचे केंद्र बनू शकते

**नवी दिल्ली** : अयोध्या केवळ एक भौगोलिक जागा नसून भारताच्या सांस्कृतिक आणि सभ्यता सातत्याचे प्रतीक आहे आणि हे पवित्र शहर भारताच्या सॉफ्ट पॉवरचे केंद्र बनू शकते, असे जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी शुक्रवारी सांगितले. येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रात आयोजित अयोध्या पर्व २०२६ मध्ये आपल्या भाषणात ते असेही म्हणाले की, जागतिक अस्थिरतेच्या काळात प्रभू रामाने सांगितलेली सलोखा, त्याग आणि सामायिक समृद्धीची मूल्ये अधिकच समर्पक ठरतात. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री दिया कुमारी, संघाचे नेते सुरेश भैय्याजी जोशी, अयोध्येचे माजी खासदार लल्लू सिंह यांच्यासह इतरही व्यासपीठावर उपस्थित होते.



### ३,७०० अवैध सिलिंडर जप्त

**हैदराबाद** : तेलंगणाच्या नागरी पुरवठा विभागाच्या पथकाने गैरवापराला आळा घालण्यासाठी केलेल्या कारवाईचा भाग म्हणून १२ मार्चपासून बेकायदेशीरपणे साठवलेले सुमारे ३,७०० घरगुती एलपीजी सिलिंडर जप्त केले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. या कारवाईदरम्यान त्यांनी १.१० कोटी रुपये किमतीचे ७० छोटे सिलिंडरही जप्त केले. या कारवाईच्या संदर्भात एकूण २१६ एफआयआर नोंदवण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले.

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांचा आरोप

# विशेष अधिवेशनाने आचारसंहितेचा भंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूतील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने संसदेत विशेष अधिवेशन बोलावण्याचा निर्णय घेतल्याने नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. निवडणुकांमध्ये राजकीय फायदा मिळवण्यासाठीच सरकारने महिला आरक्षण कायद्यात सुधारणा आणि मतदारसंघ पुनर्रचनेसंदर्भातील विधेयके मंजूर करण्यासाठी घाईघाईने विशेष अधिवेशन बोलावले असून हे आदर्श आचारसंहितेचे घोर उल्लंघन आहे, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसचे संचार प्रभारी सरचिटणीस जयराम रमेश यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सरकारच्या मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेवर गंभीर आक्षेप घेतले. मतदारसंघ पुनर्रचना घाईघाईने केल्यास त्याचे देशाच्या संघराज्य रचनेवर धोकादायक परिणाम होतील, असा इशारा त्यांनी दिला. लोकसभेतील जागांची वाढ प्रमाणशीर असेल असा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात दक्षिण, ईशान्य आणि पश्चिम भारतातील राज्यांचे प्रतिनिधित्व तुलनेने कमी होईल, असा त्यांचा दावा आहे.

अनौपचारिक माहितीनुसार लोकसभेच्या जागांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवण्याचा प्रस्ताव आहे. सध्या लोकसभेच्या ५४३ जागा असून त्या वाढवून ८१६ करण्याचा विचार सुरू असल्याचे सांगितले जात आहे. या बदलानंतर उत्तर प्रदेशासारख्या मोठ्या राज्यांचे संख्याबळ मोठ्या प्रमाणात वाढेल, तर केरळसारख्या राज्यांना तुलनेने कमी जागा मिळतील, असे रमेश यांनी नमूद केले. त्यामुळे देशातील राजकीय शक्ती संतुलन बदलू शकते, अशी भीती काँग्रेसने व्यक्त केली आहे. महिला आरक्षणाचा कायदा म्हणजेच नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३ मध्ये मंजूर झाला होता. मात्र त्यानंतर जवळपास ३० महिने सरकारने कोणतीही हालचाल केली नाही आणि आता निवडणुकांच्या तोंडावर अचानक त्याची अंमलबजावणी करण्याची घाई सुरू झाली आहे, असा आरोपही काँग्रेसने केला. महिला आरक्षणाची अंमलबजावणी जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच होईल, असे सरकारने यापूर्वी सांगितले होते. मात्र आता जनगणना प्रक्रिया पूर्ण होण्याची वाट न पाहता स्वतंत्र घटनादुरुस्ती करून महिला आरक्षण लागू करण्याचा विचार सुरू असल्याचे सांगितले जात आहे. या विशेष अधिवेशनाचा एकमेव उद्देश पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू निवडणुकांवर प्रभाव टाकणे हा आहे. हे अधिवेशन काही दिवसांनी बोलावता आले असते, परंतु निवडणुकांच्या काळातच ते बोलावण्यात आले, असा आरोप काँग्रेसने केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेस नेते राहुल गांधी हे पक्षाच्या ज्येष्ठ खासदारांची बैठक घेणार असून विरोधी पक्षांसोबत संयुक्त रणनीती ठरवली जाणार आहे.

संसदीय कामकाज मंत्री किरन रिजिजू यांनी महिला आरक्षण विधेयकात सुधारणा करण्याबाबत काँग्रेससोबत चर्चा करण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. काँग्रेसने सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली होती, कारण त्या काळात विविध राज्यांमध्ये निवडणुका सुरू होत्या आणि आदर्श आचारसंहिता लागू होती. मात्र सरकारने सर्वपक्षीय बैठकीऐवजी विशेष अधिवेशन बोलावण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

दरम्यान, १६ एप्रिलपासून संसद पुन्हा सुरू होणार असून १६, १७ आणि १८ एप्रिल या तीन दिवसांत विशेष अधिवेशन होण्याची शक्यता आहे. या अधिवेशनात महिला आरक्षण कायद्यातील दुरुस्ती आणि मतदारसंघ पुनर्रचनेसंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयके मंजूर करण्याचा सरकारचा प्रयत्न असू शकतो.

## नौदलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची : राजनाथसिंह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**विशाखापट्टणम** : देशाचा ९५ टक्के व्यापार आणि ऊर्जा पुरवठा समुद्रमार्गे होत असल्याने व्यापारी जहाजमार्ग आणि तेलवाहू जहाजांच्या सुरक्षेमध्ये भारतीय नौदलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केले. ते येथे स्वदेशी बनावटीच्या स्टेल्थ फ्रिगेट आयएनएस तारागिरीच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.

या वेळी त्यांनी सांगितले की, भारतीय नौदल हिंद महासागर क्षेत्रात सातत्याने सक्रिय असून पर्शियन आखातापासून मलाक्का सामुद्रधुनीपर्यंत भारताचे सागरी हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचे काम नौदल करत आहे. सागरी मार्गांवर कोणताही धोका निर्माण झाल्यास भारतीय नौदल तत्काळ प्रतिसाद देत असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रोजेक्ट १७ए अंतर्गत तयार करण्यात आलेली आयएनएस तारागिरी ही चौथी युद्धनौका असून ती मुंबईतील माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड येथे बांधण्यात आली आहे. सुमारे ६,६७० टन वजनाची ही आधुनिक स्टेल्थ फ्रिगेट अत्याधुनिक रचना आणि अभियांत्रिकी क्षमतेचे उदाहरण मानली जात आहे. या युद्धनौकेत विविध अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली बसवण्यात आली आहे. या जहाजाची रचना अशी करण्यात आली आहे की त्याचा रडार क्रॉस-सेक्शन कमी राहतो, त्यामुळे शत्रूच्या रडारला चकवा देत गुप्त कारवाया करणे आणि गुंतागुंतीच्या सागरी परिस्थितीत टिकून राहणे शक्य होते.

संरक्षण मंत्र्यांनी आपल्या भाषणात भारतीय नौदलाच्या मानवतावादी आणि बचाव मोहिमांचाही विशेष उल्लेख केला. संकटकाळात स्थलांतर मोहीम, मानवतावादी मदत आणि आपत्कालीन परिस्थितीत भारतीय नौदल नेहमी आघाडीवर राहिले असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय नौदल हे भारताच्या मूल्यांचे आणि वचनबद्धतेचे प्रतीक असल्याचेही त्यांनी नमूद केले. देशासाठी मजबूत आणि सक्षम नौदल हा पर्याय नसून ती अत्यावश्यक गरज असल्याचे सांगत त्यांनी सागरी सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले.

## चीन संबंधित सायबर रॅकेटचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद** : लग्नाचे आमिष, परदेशात स्थायिक होण्याचे स्वप्न आणि क्रिप्टोकरन्सी गुंतवणुकीच्या नावाखाली एका वृद्ध वकिलाची ५७ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला असून या प्रकरणाचे धागेदोरे चीनशी संबंधित सिंडिकेटपर्यंत पोहोचल्याचे तपासात उघड झाले आहे. या रॅकेटचे जाळे अहमदाबाद, दुबई आणि कंबोडिया या ठिकाणी पसरले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका वृद्ध वकिलाला सोशल मीडियाच्या माध्यमातून एका तरुणीने संपर्क साधला. मैत्री, प्रेम आणि लग्नाचे आश्वासन देत तिने त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर इटलीमध्ये एकत्र व्यवसाय आणि आयुष्य सुरू करण्याचे स्वप्न दाखवत क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. सुरुवातीला काही व्यवहार दाखवून विश्वास बसवण्यात आला आणि नंतर टप्प्याटप्प्याने एकूण ५७ लाख रुपये गुंतवायला लावले. मात्र काही दिवसांनंतर संपर्क तुटला आणि गुंतवलेली संपूर्ण रक्कम गायब झाली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित वकिलाने पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर अहमदाबाद पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने तपास सुरू केला. तपासादरम्यान पैशांचा माग काढताना सुमारे ९ लाख रुपये ताहिर आणि मकसूद यांच्याशी संबंधित बँक खात्यांमध्ये जमा झाल्याचे आढळून आले. या धाग्याच्या आधारे पोलिसांनी पुढील तपास वेगाने केला.

तपासात पुढे अदनान आणि एजाज या व्यक्तींची नावे समोर आली. त्यांनी बनावट कंपन्या उघडून भाड्याने घेतलेल्या बँक खात्यांद्वारे फसवणुकीची रक्कम वेगवेगळ्या खात्यांमध्ये वळवण्याचे काम केल्याचे निष्पन्न झाले. या खात्यांचा वापर 'म्यूल अकाउंट' म्हणून केला जात होता. पोलिसांनी या दोघांना ताब्यात घेतले आहे.

## उत्तराखंडच्या साहसी पर्यटनावर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून** : उत्तराखंडमधील वाढत्या साहसी पर्यटन क्षेत्रास यंदाच्या हंगामात मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत असून वाढत्या भू-राजकीय तणावाचा त्यावर थेट परिणाम झाल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे परदेशी पर्यटकांच्या बुकिंगमध्ये मोठी घट झाली आहे. परिणामी राज्यातील ट्रेकिंग आणि गिर्यारोहण क्षेत्रात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यभरातील टूर ऑपरेटर्सनुसार, वर्षाच्या या काळात साधारणपणे परदेशी पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात चौकशी आणि आरक्षणे होत असतात. मात्र यंदा परिस्थिती पूर्णपणे वेगळी असून अनेक ठिकाणी बुकिंग कार्यालयांमध्ये अक्षरशः शांतता पसरली आहे. अमेरिका, युनायटेड किंगडम, इस्रायल आणि युरोपमधील देशांमधून येणाऱ्या ट्रेकर्सचा ओघ दरवर्षी या काळात सुरू होतो, परंतु यावर्षी नवीन चौकशी जवळपास बंद झाली आहे. आधीच झालेली अनेक बुकिंग्स पुढे ढकलली जात आहेत किंवा थेट रद्द केली जात आहेत.

गढवाल माउंटनियरिंग ट्रेकिंग असोसिएशनचे पदाधिकारी जयेंद्र राणा यांनी सांगितले की, मार्चपर्यंत आंतरराष्ट्रीय गटांकडून सर्वाधिक बुकिंग मिळतात, परंतु यंदा परिस्थिती अत्यंत निराशाजनक आहे. अमेरिका आणि युरोपमधील नियमित ग्राहकांकडून साधी चौकशीही झालेली नाही, असे त्यांनी सांगितले.

या परिस्थितीचा परिणाम केवळ आंतरराष्ट्रीय पर्यटनावरच नाही तर देशांतर्गत पर्यटनावरही होत आहे. उंच पर्वतीय भागातील ट्रेकिंग मोहिमांसाठी आवश्यक असलेले इंधन, गॅस आणि केरोसीन यांसारख्या वस्तूंच्या पुरवठा साखळीत अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे ट्रेकिंग मोहिमांचे नियोजन करणेही कठीण झाले आहे. स्थानिक प्रशासनाने १ एप्रिलपर्यंत गिर्यारोहण हंगाम सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे पर्यटन क्षेत्राला यावर्षी चांगल्या हंगामाची अपेक्षा होती. परंतु जागतिक तणाव आणि अनिश्चिततेमुळे संपूर्ण उद्योगच अडचणीत आला आहे. दरवर्षी या प्रदेशात १० हजारांहून अधिक परदेशी गिर्यारोहक आणि ट्रेकर्स येतात आणि स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी हे पर्यटन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

गिर्यारोहण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, भू-राजकीय परिस्थितीमुळे आधीच अस्तित्वात असलेल्या प्रशासकीय आणि धोरणात्मक अडचणी आणखी वाढल्या आहेत.

## तामिळनाडूत भाजपचे २७ उमेदवार जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : आगामी तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष (भाजप)ने शुक्रवारी आपल्या २७ उमेदवारांची यादी जाहीर केली. अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघमसोबतच्या जागावाटपानंतर काही प्रमाणात असंतोष आणि चर्चेमुळे उमेदवार यादी जाहीर होण्यास विलंब झाला होता.

अपेक्षेप्रमाणे या यादीत माजी प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांचे नाव समाविष्ट करण्यात आलेले नाही. अण्णामलाई विधानसभा निवडणूक लढवणार की नाही याबाबत संभ्रम होता, मात्र या यादीमुळे ते निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांनी यापूर्वीच निवडणूक लढवण्यास फारसा रस नसल्याचे संकेत दिले होते. या यादीत काही प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. माजी राज्यपाल तमिळसाई सौंदरराजन मायलापूर मतदारसंघातून, केंद्रीय राज्यमंत्री एल. मुरुगन अवनशी मतदारसंघातून, भाजप महिला मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा वनथी श्रीनिवासन कोईम्बतूर मतदारसंघातून, तर प्रदेशाध्यक्ष नैनार नागेंद्रन सत्तूर मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. २०२१ मध्ये काँग्रेसकडून निवडून आलेल्या आणि नंतर भाजपमध्ये प्रवेश केलेल्या एस. विजयधारानी यांना विलावन्कोड मतदारसंघातून पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपच्या चार विद्यमान आमदारांपैकी तिघांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. या यादीतील एकूण २७ उमेदवारांपैकी पाच महिला उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. एआयएडीएमकेच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत भाजपला २७ जागा मिळाल्या आहेत. काही नेत्यांना अपेक्षेपेक्षा कमी आणि अनुकूल नसलेल्या जागा मिळाल्याची नाराजी असल्याची चर्चा सुरू आहे.

## गुजरातमध्ये दाखल होण्याचे होते संकेत

# इराणी टँकर्स भारताऐवजी चीनकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : अमेरिकेने निर्बंध घातलेल्या इराणचे कच्चे तेल घेऊन भारताकडे येणाऱ्या एका टँकरने मध्यंतरीच आपला मार्ग बदलून चीनकडे वळवला असल्याची माहिती समोर आली आहे. हा टँकर भारतात आला असता तर जवळपास सात वर्षांनंतर भारतात येणारी इराणी कच्च्या तेलाची पहिली खेप ठरली असती.

जहाज-ट्रॅकिंग फर्म केप्लरच्या माहितीनुसार, अमेरिकेने निर्बंध घातलेला 'पिंग शुन' हा अफ्रामॅक्स टँकर गुजरातमधील वडीनार बंदराकडे येत असल्याचे संकेत देत होता. मात्र प्रवासादरम्यान जहाजाने आपले गंतव्यस्थान बदलून चीनमधील डोंगयिंग असे दाखवण्यास सुरुवात केली.

या टँकरमध्ये सुमारे सहा लाख बॅरल इराणी कच्चे तेल असल्याचे सांगितले जात आहे. २०१९ नंतर भारताने खरेदी केलेले हे पहिले इराणी तेल ठरले असते. अमेरिकेने अलीकडेच काही निर्बंधांमध्ये तात्पुरती सूट दिल्यानंतर भारतीय रिफायनरी कंपन्या समुद्रात साठवलेल्या इराणी तेल खरेदी करण्याच्या शक्यता तपासत होत्या. तज्ज्ञांच्या मते, टँकरने गंतव्यस्थान बदलण्यामागे पेमेंटशी संबंधित अटी कारणीभूत असण्याची शक्यता आहे. पूर्वी ३० ते ६० दिवसांच्या क्रेडिटवर व्यवहार होत असत, परंतु आता विक्रेते आगाऊ किंवा तातडीने पैसे देण्याची अट घालत असल्याचे सांगितले जाते. वडीनार येथे नायरा एनर्जीचा मोठा तेल शुद्धीकरण प्रकल्प असून तो रशियन कंपनी रोसनेफ्टच्या पाठिंब्याने चालवला जातो. हा टँकर तिथे येण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

ऐतिहासिकदृष्ट्या भारत हा इराणच्या कच्च्या तेलाचा मोठा खरेदीदार होता. २०१८ मध्ये अमेरिकेने कडक निर्बंध लागू केल्यानंतर मे २०१९ पासून भारताने इराणकडून तेल आयात पूर्णपणे थांबवली. त्याऐवजी भारताने मध्य पूर्व, अमेरिका आणि इतर देशांकडून तेल आयात वाढवली. सर्वाधिक काळात भारताच्या एकूण कच्च्या तेल आयातीत इराणचा वाटा सुमारे ११.५ टक्के होता. २०१८ मध्ये भारताने दररोज सुमारे ५.१८ लाख बॅरल इराणी तेल आयात केले होते. मात्र निर्बंधांनंतर ही आयात बंद झाली.

सध्या इराणचे मोठ्या प्रमाणावर तेल समुद्रात साठवून ठेवलेले असून त्यातील काही तेल भारताला विकले जाऊ शकते. मात्र पेमेंट व्यवस्था, निर्बंध आणि आर्थिक व्यवहारातील अडचणी यामुळे अशा व्यवहारांमध्ये अजूनही अनिश्चितता कायम असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## मालदा प्रकरणातील सूत्रधाराला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यातील कालियाचक बीडीओ कार्यालयात सात न्यायिक अधिकाऱ्यांना घेराव घालण्याच्या घटनेप्रकरणी राज्य पोलिसांनी कथित सूत्रधार असलेल्या वकील मोफक्करुल इस्लाम याला अटक केली आहे. घटनेनंतर दोन दिवसांनी पोलिसांनी उत्तर बंगालमधील बागडोगरा विमानतळावरून त्याला ताब्यात घेतले. तो बंगळूरला पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पश्चिम बंगाल पोलिसांनी सांगितले की, बुधवारी तीन वेगवेगळ्या ठिकाणी भाषणे देऊन स्थानिकांना भडकवल्याच्या आरोपावरून त्याच्याविरोधात कालियाचक पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर न्यायिक अधिकाऱ्यांच्या घेरावाची घटना घडली. या घटनेनंतर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला होता. अतिरिक्त पोलीस महासंचालक (उत्तर बंगाल) के. जयरामन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, उत्तर दिनाजपूर जिल्ह्यातील इतहारचा रहिवासी असलेला मोफक्करुल इस्लाम सध्या कोलकाता येथे राहत होता. पश्चिम बंगाल गुन्हे अन्वेषण विभाग आणि सिलीगुडी पोलिसांच्या मदतीने बागडोगरा विमानतळावरून त्याला आणि त्याच्या एका साथीदाराला अटक करण्यात आली. या प्रकरणी एकूण १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांची संख्या आता ३५ वर पोहोचली आहे. यामध्ये इंडियन सेक्युलर फ्रंट या पक्षाच्या एका उमेदवाराचाही समावेश आहे. मालदा जिल्ह्यातील मोथाबारी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत असलेले आयएसएफचे उमेदवार मौलाना शाहजहान अली आणि इतर १७ जणांना घेरावाशी कथित संबंध असल्याच्या आरोपाखाली गुरुवारी अटक करण्यात आली. मतदारांची नावे वगळल्याच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनादरम्यान ही घेरावाची घटना घडली होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बंगालमध्ये निवडणूक आयोगाने सुमारे ६० लाख मतदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी न्यायिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

### पंजाब स्फोट प्रकरणी ओळख पटली

**चंदीगड** : येथील सेक्टर ३७ मधील पंजाब भाजप मुख्यालयाबाहेर झालेल्या स्फोट प्रकरणी दोन संशयितांची ओळख पटली आहे, अशी माहिती चंदीगड पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. त्यांनी माहिती दिली की, संशयितांची ओळख पंजाबच्या रूपनगर जिल्ह्यातील गुरतेज सिंग आणि अमनप्रीत सिंग अशी पटली असून, त्यांना पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सूत्रांनुसार, चंदीगड पोलीस पंजाबमधील त्यांच्या सहकाऱ्यांशी समन्वय साधून संशयितांचा शोध घेत आहेत.

## जीपीएस स्पूफिंगमुळे विमाने चुकली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाचा अनपेक्षित परिणाम नागरी विमान वाहतुकीवर होत असून, संयुक्त अरब अमिरातीच्या हवाई हद्दीतून जाणारी भारतातील अनेक विमाने जीपीएस स्पूफिंगमुळे वारंवार मार्गापासून भरकटत असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे विमानांना लांबचा मार्ग घ्यावा लागत असून इंधन खर्च वाढत आहे.

इराण, इस्रायल आणि इराकची हवाई हद्द बंद असल्यामुळे भारतातील विमान कंपन्या संयुक्त अरब अमिरातीच्या हवाई मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहेत. मात्र या परिसरात जीपीएस सिग्नलमध्ये हस्तक्षेप किंवा दिशाभूल करणारे सिग्नल पाठवण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या प्रक्रियेला जीपीएस स्पूफिंग असे म्हटले जाते. ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या नेव्हिगेशन प्रणालीला दिशाभूल करण्यासाठी काही देश मोठ्या प्रमाणावर स्पूफिंग तंत्रज्ञान वापरत आहेत. त्याचा परिणाम नागरी विमानांवरही होत असून विमानांचा मार्ग काही काळासाठी बदलतो आणि नंतर पायलट मॅन्युअल नेव्हिगेशनद्वारे विमान पुन्हा मूळ मार्गावर आणतात.

भारतीय विमानतळ प्राधिकरण तसेच विमान कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी अशा घटनांमध्ये वाढ झाल्याची पुष्टी केली आहे. अधिकाऱ्यांच्या मते, यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला तातडीचा मोठा धोका नसला तरी उड्डाणांना विलंब होतो आणि अतिरिक्त इंधन खर्चामुळे विमान कंपन्यांचा खर्च वाढतो.

## स्थानिक चलनाला मिळाला दिलासा; कृत्रिम मागणी रोखली

# आरबीआयमधील धुरंदरांनी रुपयाला सावरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय)ने रुपयावरील दबाव कमी करण्यासाठी आणि डॉलरची कृत्रिम मागणी रोखण्यासाठी घेतलेल्या कठोर उपाययोजनांचा परिणाम चलन बाजारात दिसू लागला असून रुपयाला तात्पुरता दिलासा मिळाला आहे. सट्टेबाजीला आळा घालण्यासाठी आणि बँकांच्या आर्बिट्राज व्यवहारांवर निर्बंध आणण्यासाठी आरबीआयने सर्वात कठोर उपाययोजना लागू केल्याचे मानले जात आहे.

गुरुवारी रुपया १.८ टक्क्यांनी वधारून ९३.१० या पातळीवर पोहोचला. गेल्या १३ वर्षांतील एका दिवसातील ही सर्वात मोठी वाढ मानली जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून रुपया आशियातील सर्वात कमजोर कामगिरी करणाऱ्या चलनांपैकी एक ठरला होता. परकीय भांडवलाचा बहिर्वाह, जागतिक शुल्क युद्ध, वाढत्या कच्च्या तेलाच्या किमती आणि चलन बाजारातील सट्टेबाजी यामुळे रुपयावर सतत दबाव वाढत होता. रुपयाची घसरण रोखण्यासाठी आरबीआयने मोठ्या प्रमाणावर डॉलर विक्री केली. २०२५ मध्ये अस्थिरता रोखण्यासाठी सुमारे ५१ अब्ज डॉलर विक्री करण्यात आली होती, तर गेल्या महिन्यातच ३० अब्ज डॉलरपेक्षा जास्त डॉलर बाजारात विकण्यात आले. मात्र केवळ डॉलर विक्री आणि व्याजदरातील बदल या पारंपरिक उपायांनी अपेक्षित परिणाम दिसत नव्हता. कारण चलन बाजारात केवळ मागणी-पुरवठ्याचे समीकरण नव्हते, तर बँकांचे आर्बिट्राज व्यवहार आणि सट्टेबाजी यांचाही मोठा प्रभाव होता.

बँका मुंबईतील ऑनशोअर बाजारात डॉलर खरेदी करत आणि त्याच वेळी दुबई, सिंगापूर, लंडन यांसारख्या ऑफशोअर बाजारांमध्ये व्यवहार करून किंमतीतील फरकातून जोखीम कमी ठेवून नफा कमवत होत्या. हा आर्बिट्राज व्यवहार मार्चअखेर सुमारे १४० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला होता. त्यामुळे रुपयावर कृत्रिम दबाव निर्माण होत होता.

ही परिस्थिती लक्षात घेऊन आरबीआयने बँकांच्या नेट ओपन पोझिशनवर मर्यादा घातली आणि १० एप्रिलपर्यंत डॉलरमधील एकूण पोझिशन १०० दशलक्ष डॉलरपर्यंत कमी करण्याचे आदेश दिले. यामुळे बँकांना मोठ्या प्रमाणावर डॉलर विकावे लागणार होते आणि त्यामुळे रुपया मजबूत होईल अशी अपेक्षा होती. मात्र सुरुवातीला बँकांनी कॉर्पोरेट्समार्फत व्यवहार करून नियमांना वळसा घालण्याचा प्रयत्न केला आणि रुपया उलट घसरून ९५ प्रति डॉलरच्या जवळ पोहोचला. यानंतर आरबीआयने तात्काळ दुसरी कारवाई करत बँकांसाठी असलेल्या पळवाटा बंद केल्या. नॉन डिलिव्हरेबल फॉरवर्ड व्यवहारांवर निर्बंध घालण्यात आले, रद्द केलेल्या फॉरवर्ड करारांचे पुनर्बुकिंग बंद करण्यात आले तसेच संबंधित पक्षांमधील चक्रीय परकीय चलन व्यवहारांवरही मर्यादा आणण्यात आल्या. परकीय चलन व्यवहार हे केवळ खऱ्या व्यावसायिक गरजांसाठी असल्याचा पुरावा देणे बंधनकारक करण्यात आले. या सर्व उपाययोजनांमुळे बँकांना डॉलर विकण्याशिवाय पर्याय उरला नाही आणि त्यामुळे डॉलरचा पुरवठा वाढून रुपयाला आधार मिळाला. १० एप्रिलपर्यंत बँकांना त्यांच्या डॉलर पोझिशन्स कमी कराव्या लागणार असल्याने पुढील काही दिवस रुपया तुलनेने स्थिर राहू शकतो.